**(आता प्रशिक्षीत कॉलटेकर पुणे शहर पोलीस ) प्रेसनोट दि.०४/१०/२०१८**

**पोलीस आयुक्तालय,पुणे शहर येथे नियंत्रण कक्षाकडील (१०० नंबर) येथे काम करणा-या कॉलटेकर करीता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी संवाद / कौशल्य कार्यशाळा आयोजीत केले बाबत**

---

पोलीस आयुक्तालय स्तरांवर कर्तव्य बजाविणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांसाठी पोलीस आयुक्तालय,पुणे शहर येथे प्रशिक्षण / कार्यशाळा मोठया प्रमाणात राबविल्या जात आहेत. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे सद्या चालु असलेल्या कामकाजा मध्ये सुसत्रता आणुन, काम काजाची कार्यक्षमता वाढवुन त्याचा दर्जा वाढविणे, तपासकाम अणि व्यवस्थापनाचे विविध कौशल्य विकसित करून, विविध क्षेत्रात काम करण्याची त्यांची पात्रता वाढविणे आणि त्यासाठी त्यांचे संबंधीत कामाचे क्षेत्रामध्ये आवड निर्माण करणे इत्यादी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यशैलीत वैयक्तिक आणि व्यावसायीक कुशलता विकसित करणे हा प्रशिक्षणाचा / कार्यशाळेचा मुळ हेतु आहे.

नियंत्रण कक्ष,पुणे शहर पोलीस आयुक्तालय येथील १०० नंबरवर अत्यावश्यक सेवा येथे काम करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना जनतेशी कशा पध्दतीने बालायचे आहे. या संदर्भातील विषय “संवाद कौशल्य” यावर मार्गदर्शन करणेकामी श्री.देवेंद्र कोठारी, नागपुर यांनी दि.०३/१०/१८ व दि.०४/१०/२०१८ रोजी सकाळी ०९/३० ते १७/३० वा. पर्यंत पुणे शहर पोलीस आयुक्तालय येथील कॉन्फरन्स हॉल येथे कार्यशाळा घेण्यात आली होती. त्यामध्ये नियंत्रणकक्ष पुणे शहर येथील (कॉल टेकर) पोलीस महिला व पुरूष कर्मचारी तसेच नियंत्रण कक्ष येथे कर्तव्य बजाविणारे पोलीस अधिकारी (सीआरओ) यांना त्यांचे कामकाजात कशी कार्यक्षमता वाढवावी. तसेच येणारा कॉल हा कोणत्या प्रकारचा आहे. त्यानुसार त्यांना प्रतिसाद देवुन,त्यांचेशी संवाद कसा साधायचा व आपली मानसिकता कशी ठेवायची. त्यामधुन आपला संवाद जनतेशी कसा उपयुक्त होईल व त्यामधुन जनतेची तक्रार किंवा अडचण कशाप्रकारे दुर करता येवुन,त्यांचे समाधान होईल.

सदर कार्यशाळेसाठी नियंत्रण कक्षाकडील कॉलटेकर पोलीस अधिकारी व कर्मचारी हजर होते.


साधने असूनही वापरण्याचे ज्ञान नसेल
तर त्यांचा काय उपयोग?

